



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : ६३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## माझ्याशी बोलली नाहीस, तर बदनामी करेन

### सततच्या छळाला कंटाळून अल्पवयीन मुलीने जीव दिला...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, रायगड :** सोशल मीडियावर वाढत चाललेले अनैतिक संबंध आणि मोबाइलवरील छळाचा एक धक्कादायक प्रकार मुरुड तालुक्यात घडला आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड पोलिस स्टेशनपासून येथील अल्पवयीन मुलीने विवाहित पुरुषाच्या धमक्या आणि मानसिक छळाला कंटाळून आपल्या आयुष्याची अखेर केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी कडकर (नाव बदलेले) यांची मुलगी मुरुड येथील स्थानिक महाविद्यालयात शिक्षण घेत होती. त्याच गावातील संतोष सांबळे (नाव बदलेले) हा विवाहित असून सुद्धा कडकर यांची मयत मुलगी हिच्याशी सतत फोन आणि चॅटद्वारे संपर्क साधत होता. अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही, त्याने तिच्याशी अनुचित संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मयत मुलीने संवाद टाळल्यानंतर आरोपीने तिला सतत फोन करून माझ्याशी बोलली नाहीस तर तुझी बदनामी करेन, कॉलेजमध्ये सांगीन, तुला जगू देणार नाही, अशा शब्दांत धमक्या दिल्या.या सततच्या मानसिक छळाला कंटाळून पीडित मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आपले जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच मुरुड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. सखोल तपासानंतर आरोपी सांबळे याच्याविरुद्ध भादंवि कलम ३०६ नुसार जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेने फिर्यादी यांच्या गावासहीत परिसरात शोककळा पसरली असून, मोबाइलच्या मागे लपलेला सायबर छळ आता थेट जीव घेतोय अशा प्रतिक्रिया समाजमाध्यमांतून उमटत आहेत. स्थानिकांनी अशा प्रकरणांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मोबाइलच्या माध्यमातून सुरू होणारा छळ, धमक्या आणि दबाव – हे फक्त सायबर अपराध नाहीत, तर निष्पाप जीव घेणारे विष बनत चालले आहे, असे वक्तव्य सामाजिक कार्यकर्त्या रुपाली भाटे यांनी मत व्यक्त केले आहे. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

## शिवसेना आमदार गायकवाडांचा मोठा दावा

### बुलडाणा जिल्ह्यात लाखावर बोगस मतदार?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, बुलडाणा :** सध्या बोगस मतदार याद्यांवर मोठी चर्चा सुरू असतानाच शिवसेनेचे बुलढाण्याचेआमदार संजय गायकवाडयांनी जिल्ह्यात एक लाखावरबोगस मतदारअसण्याची शक्यता व्यक्त केली. चार हजार मतदारांची नावे याद्यांमध्ये दोनवेळा असल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असून, निवडणूक आयुक्तांनाही याची माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले.

मतदार यादीतील घोळाच्या अनुषंगाने आमदार गायकवाड यांनी गुरुवारी माध्यमांशी संवाद साधला. मतदार याद्यांमध्ये एकाच मतदाराची दोन–दोन नावे असल्याचा दावा करीत आमदार गायकवाड म्हणाले, अनेक लोक जिल्ह्यात तीस, तीस वर्षे राहिले, अधिकारीही राहून गेले, त्यांचीदेखील नावे याद्यांमध्ये तशीच आहेत. ज्यांचे निधन झाले, अशांची नावेही कायम आहेत. हा आकडा जिल्ह्यात लाखाहून अधिक आहे.निवडणूक आयोगम्हणतो नावे काढू नका. दोन–दोन नावे असताना काढली का जात नाही, असा कोणता कायदा आहे की बोगस नावे कायम ठेवले जातात, असा सवालही गायकवाड यांनी केला.आधार सीडिंगमुळे थांबेल 'मतदारघोळ' मतदार याद्या पारदर्शक व्हाव्यात, मतदारांच्या नावांमधील घोळ थांबवण्यासाठी मृत्यू दाखला निवडणूक आयोगाशी जोडला तर कुणाचा मृत्यू झाला हे समजेल आणि ते नाव वगळले जाईल. शिवाय आयोगाशी आधार लिंक केल्यास बोगस मतदारांची अर्थात दोन–दोन नावे येऊ शकणार नाहीत, असा पर्याय आमदार गायकवाड यांनी निवडणूक आयोगाला सुचविला आहे. निवडणूक आयोग ही विशेष संस्था असल्याने त्यांनी हा पर्याय ठरवायला हवा, असेही संजय गायकवाड म्हणाले.

**विरोधकांना घरचा रस्ता दाखवा- एकनाथ शिंदे**

आपण मुंबईतून कोकणासाठी रोरो सेवा सुरू केली. आता येत्या निवडणुकीत विरोधकांसाठी गो–गो म्हणजे घरचा रस्ता दाखवा. लोकांना फेसबुक लाइव्ह चालत नाही, थेट भेट हवी असते', अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना गुरुवारी लक्ष्य केले. 'इज्जत गेली गावाची आणि मग आठवण आली भावाची', ही म्हण कोणाला लागू पडते हे मी सांगत नाही, असेही ते म्हणाले. रत्नागिरी येथे आयोजित पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री उदय सामंत, गृहराज्यमंत्री योगेश कदम, आमदार किरण सामंत,आमदार नीलेश राणे, रवींद्र फाटक माजी आमदार राजन साळवी, राजन तेली आदी उपस्थित होते.

## 'शिवसेनेनं सांगितलं महायुतीत दंगा नको', पुण्याचं राजकारण नव्या वळणावर?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, पुणे :** गुंड निलेश घायवळ याचे राजकीय कनेक्शन समोर आल्यानंतर संपूर्ण राज्याचं राजकारण पेटलं आहे. यामध्ये प्रामुख्याने शिवसेनेचे पुणे महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या आरोपांनंतर महायुतीमध्येच वाद सुरु झाले आहेत. रवींद्र धंगेकर यांनी गुंड निलेश घायवळ याच्याशी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या ऑफिसमधील व्यक्ती असलेले समीर पाटील यांचे संबंध आहेत, असे हे आरोप करून एकच खळबळ उडवून दिली होती.

त्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातील गुन्हेगारीवरून सातत्याने भारतीय जनता पक्षाला टार्गेट केलं. मात्र, धंगेकर यांच्या या पवित्र्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडतोय का? अशी शक्यता निर्माण होत असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रवींद्र धंगेकर यांना महायुतीत दंगा नको, असा इशारा वजा सूचना केली.

त्यानंतर रवींद्र धंगेकर हे महायुतीत एकाकी पडले आहेत का? असा प्रश्न निर्माण होऊ लागला. हा प्रश्न निर्माण होत असतानाच आता रवींद्र धंगेकर यांचे जुन्या पक्षातले सहकारी अर्थात काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी काँग्रेस रवींद्र धंगेकर यांच्या पाठीमागे ठामपणे उभा असल्याचं सांगितलं आहे. त्यामुळे आधी रोहित पवार आणि आता अरविंद शिंदे यांनी रवींद्र धंगेकर यांना पाठिंबा दिल्यामुळे महाविकास आघाडी धंगेकर यांच्यासोबत उभे असल्याचं स्पष्ट झालं आहे.'गेल्या अनेक दिवसापासून माध्यमांमधून आम्ही पुण्यातील गुन्हेगारीचे अनेक प्रश्न बघत आहोत. त्यामध्ये धंगेकर जो प्रश्न उचलत आहेत तो पुणेकरांसाठी आहे. अनेकवेळा त्यांच्या तोंडामधून आम्ही, मी पुणेकर म्हणून विचारत आहे, असे शब्द ऐकले आहेत, आणि ते पुणेकर म्हणून विचारत असतील तर कोथरूडमध्ये मुरलीधर मोहोळ केंद्रीय राज्यमंत्री आहेत चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री राहिलेले आहेत.

त्यांच्याच कोथरूडमधील गुन्हेगार हा आंतरराष्ट्रीय कायदे तोडून पसार झालेला आहे आणि तरीदेखील यांना उत्तर द्यायचे नाहीत. माजी आमदार म्हणून धंगेकर यांना उत्तर दिलेच पाहिजे पण सामान्य पुणेकरांनी सुद्धा जर हे प्रश्न विचारले तरी देखील तुम्हाला उत्तर द्यावे लागतील. मात्र, पत्रकारांनी प्रश्न विचारले तरी तुम्ही पत्रकार परिषद सोडून पळून जात आहात', असं अरविंद शिंदे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन'शी बोलताना म्हटलं आहे.

'धंगेकर जे प्रश्न विचारत आहेत त्यामध्ये आम्हाला तथ्य वाटत आहे. त्यामुळे मी वैयक्तिक असेल किंवा काँग्रेस पक्ष असेल आम्ही याकडे लक्ष देणार आहोत. धंगेकर जे प्रश्न विचारत आहेत ते पुणेकरांच्या सुरक्षेसाठी आहेत आणि त्यासाठी आम्ही धंगेकर यांच्या पाठीमागे ठामपणे उभे आहोत. धंगेकरांना मोक्का लावण्याची भीती दाखवली जात आहे, नोटीस पाठवल्या जात आहेत, त्यांच्याच पक्षाकडून त्यांना कॉर्नर केलं जात आहे, हे सगळं घडत असताना एक पुणेकर म्हणून धंगेकर यांच्या पाठीमागे उभे राहणे हे आमचं कर्तव्य', असल्याचं अरविंद शिंदे यांनी म्हटलंय.

दरम्यान, आता काँग्रेसचे माजी नेते असणारे रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेस सोडली तरी काँग्रेस पक्ष हा धंगेकर यांच्या मागे उभा असल्याचं चित्र पुण्यात पाहायला मिळत आहे. त्यामुळे पुण्याच्या राजकारणात येत्या काही दिवसात नवीन ट्विस्ट येणार का? हे पाहणं महत्त्वाचं आहे.

## महिला संरक्षण विषयक सर्व कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

### महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे यंत्रणांना निर्देश



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, सातारा :** महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण यासाठी आणि महिलांच्या संरक्षणासाठी शासन कटीबद्ध आहे. महिलांशी संबंधित सर्व कायद्यांची यंत्राणांनी अत्यंत काटेकोर अंमलबजावणी करावी. महिला उत्थानांच्या योजनांची तळागाळापर्यंत अंमलबजावणी करावी. महिलांशी संबंधित कायदे, योजना, उपक्रम या बाबतीत संवेदनशील राहून यंत्रणांनी आपली जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडवी, असे निर्देश महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले. महाराष्ट्र महिला आयोगाची महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी घेतली. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जून माने, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. वैशाली कडूकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शिल्पा पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे यांच्यासह सर्व यत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. महिलांसाठी विविध बाबींचा आढावा घेत असताना रुपाली चाकणकर म्हणाल्या, कामासाठी महिला मोठया प्रमाणात घराबाहेर पडत असून सर्व खाजगी व शासकीय आस्थापनांना अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातही जिल्हास्तरावर यासाठीची समिती स्थापन झाली असून या समितीने याचे ऑडिट करुन त्याचा अहवाल एका महिन्याच्या आत आयोगाला सादर करावा. बालविवाह प्रतिबंधक कायदा असल तरी छुप्या पध्दतीने बाल विवाह होत आहेत. अशावेळी लग्न पत्रिका छापणाऱ्या प्रिटींग प्रेस, अशी लग्न होत असलेली ठिकाणी समाज मंदिरे, मंगल कार्यालय, मंदिरे अशा सर्वांना नोटिसा पाठविण्याच्या सूचना ही त्यांनी यंत्रणेला दिल्या. याबाबतीत अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांची बैठक घेवून त्यांना विश्वासात घ्यावे व त्यांनी दिलेली माहिती गुप्त ठेवण्यात येईल. याबाबत त्यांना आश्वस्त ठेवण्यात यावेत. ज्या ठिकाणी बालविवाहाची प्रकरणे घडली तेथील सरपंच, ग्रामसेवक यांच्यावरही कायद्यानुसार आवयक ती कार्यवाही करावी असे निर्देयश ही त्यांनी यावेळी दिले. १८ वर्षाखालील बेपत्ता होणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत आहे. यावर गांभीर्याने विचारमंथन होणे आवश्यक असे सांगून श्रीमती चाकणकर म्हणाल्या, शिक्षण विभाग व पोलीस विभाग यांनी पुढाकार घेवून सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रबोधन करावे. या वयोगटातील मुलींशी संवाद वाढवावा. बिट मार्शलिंग, दामिनी पथक, निर्भया पथक अधिक गतीमान करावे. पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी करावी. त्यासाठी धाडसत्र त्वरीत सुरु करावेत. टोल फ्री क्रमांक ११२, १०९१, १०९८ या क्रमांकाची माहिती अधिकाधिक मुली व महिला यांच्यापर्यंत पोहचवून यावर येणाऱ्या तक्रारींची त्वरीत दाखल घ्यावी. पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्यांची संख्या जास्त असल्याने महिला ऊसतोड कामगारांची संख्याही मोठी आहे. त्यांच्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. त्याचा अहवाल आयोगाला ३ आठवड्यात सादर करावा. विवाह संस्थेतील कलहाच्या प्रकरणांमध्ये समुपदेशनाचा कालावधी कमी केला जावा. अर्जदार पिडीत असल्याने त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. आवश्यकता भासल्यास स्वाधार केंद्रामध्ये राहण्याची व्यवस्था करावी. अशा महिलांसाठी कौशल्य विकास विभागाने अल्प कालावधीचे कौशल्य विकासाचे उपक्रम राबवावेत. उमेद, माविम आणि कामगार आयुक्त विभागाने सारख्या यंत्रणांनी यासाठी पुढाकार घ्यावा. मुलींच्या शाळांमध्ये महिला मुख्याध्यापकांच्या कार्यालयामध्ये सॅनिटरी नॅपकिन्स, वेडींग बर्निंग मशिन यांची उपलब्धता करुन द्यावी. बसस्थानकामधील हिरकणी कक्ष, स्वच्छतागृह अद्यावत व सर्व सुविधा आणि सुसज्ज असावेत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी श्रीमती चाकणकर यांनी आरोग्य, पोलीस कामगार, महिला बाल विकास, स्वच्छता पाणीपुरवठा, शिक्षण आदी विभागांकडील महिला संरक्षण व सक्षमीकरणाचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये जिल्ह्यात २४६ शासकीय कार्यालये, ६१९ खासगी कार्यालये असून सर्वच्या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये तर ४८७ खाजगी कार्यालयांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन झाली आहे. प्रलंबित १३२ खासगी आस्थापनांमध्ये समिती गठीत करुन घ्यावयाची कार्यवाही सुरु आहे. २०२४ पासून ते सप्टेंबर २०२५ पर्यंत बालविवाहाच्या २४ तक्रारी प्राप्त झाल्या असून २३ बालविवाह रोखण्यात यश आले आहे एका प्रकरणामध्ये गुन्हा दाखल झाला आहे. मनोधैर्य योजनेंतर्गत २०१७ पासून २०२५ पर्यंत जिल्ह्यात ६६५ मंजूर प्रकरणे असून ३३२ प्रकरणांमध्ये आर्थिक मदत करण्यात आली आहे. उर्वरित प्रकारणांसाठी अनुदान प्राप्त झाले असून वितरणाची प्रक्रिया सुरु आहे.

लेक लाडकी योजनेंतर्गत ६ हजार ५३३ मुलींना लाभ देण्यात आला असून ५०७ लाभार्थ्यांसाठी रक्कम प्राप्त झाली आहे. पहिल्या हप्त्याची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही चालू आहे. सातारा जिल्ह्यात शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह सातारा या ठिकाणी असून महिला व बाल विकास विभागाच्या मालकीच्या जागेत वन स्टॉप सेंटरची इमारत बांधण्यात आली आहे. स्त्रियांचे हक्क सुरक्षित राहावेत यासाठी लक्ष्मीमुक्ती योजना राबविण्यात येत आहे. आतापर्यंत यामध्ये १ हजार १८९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. सन २०२४ मध्ये महिलांवरील अत्याचाराची १६८ प्रकरणे दाखल झाली होती. यासर्व प्रकरणांमध्ये चार्जशीट दाखल करण्यात आली आहे. तर ते सप्टेंबर २०२५ अखेर १४३ प्रकरणे दाखल असून याही सर्व प्रकरणांमध्ये चार्जशीट दाखल आहे. जिल्ह्यात सन २०२४ मध्ये १८ वर्षाखालील २६२ मुली बेपत्ता होत्या. तर १८ वर्षावरील १ हजार २३२ महिला बेपत्ता होत्या. यापैकी १८ वर्षाखालील प्रकरणांमध्ये २४५ प्रकरणांची निर्गती झालेली आहे. तर १ हजार ९१ प्रकरणांची निर्गती झाली आहे. यावर्षी १८ वर्षावरील १९९ प्रकरणांमध्ये १६६ प्रकरणांची निर्गती झाली असून १८ वर्षावरील ९५२ मधील ८०७ प्रकरणांची निर्गती झाली. ॲन्टी ह्युमन ट्रॅफीकींगच्या गत वर्षी ४ आणि या वर्षी ४ गुन्हे दाखल आहेत. दिवसेंदिवस सायबर क्राईम वाढत असून यामध्ये गतवर्षी ६० प्रकरणे दाखल होती. त्यापैकी ३८ प्रकरणांची निर्गती झाली आहे. यावर्षी २२ प्रकरणे दाखल असून ११ प्रकरणांची निर्गती झालेली आहे. हुंडा बळीच्या तक्रारींमध्ये गतवर्षी १ आणि यावर्षी २ तक्रारी प्राप्त आहेत. सार्वजिनक ठिकाणी झालेल्या महिलांच्या छळाच्या गतवर्षी २२ आणि यावर्षी २७ गुन्हे उघडकीस आले आहेत. कौटुंबिक हिंसाचाराची गतवर्षी १०८ तक्रारी प्राप्त झाल्या असून समुपदेशाने ९९ प्रकारणांची निर्गतीसी करण्यात आली आहे तर ९ प्रकाणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आली आहे. यावर्षी कौटुंबिक हिंसाचाराच्या ६५ तक्रारी दाखल असून समुपदेशनाने ४६ प्रकरणांची निर्गती झाली आहे. तर ६ प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलांसाठी असणाऱ्या १०९१ या हेल्पलाईन क्रमांकावर गतवर्षी २३ यावर्षी १९ तक्रारी प्राप्त आहेत. तर डाईल ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर गतवर्षी ६ हजार ९७७ तर यावर्षी ५ हजार ९०७ तक्रारी प्राप्त आहेत. सर्वच्या सर्वच तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. जिल्हयात भरोसा सेल कार्यरत असून पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीसांसाठी स्वतंत्र चेंजिंग रुम आहेत. दामिनी पथक बिट मार्शल यासाठी पुरशी वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मनोर्धेर्य योजनेंतर्गत २०२४ मध्ये १६८ गुन्हे दाखल असून १२५ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. तर यावर्षी १४३ गुन्हे दाखल असून ५१ प्रकरणे आतापर्यंत मंजूर करण्यात आली आहेत. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत १७ प्रकरणे न्यायालयात दाखल असून ४ प्रकरणांमध्ये शिक्षा झाली आहे. जिल्हा परिषदेच्या २४ शाळा या स्वतंत्र मुलींच्या शाळा आहेत. सर्व ठिकाणी शैचालय व्यवस्था असून आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. २ हजार ६६९ शाळांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्यात आल्या असून तक्रार निवारण समित्याही कार्यरत करण्यात आल्या आहेत. आदी बाबींचा आढावा या बैठकीत सादर करण्यात आला.

# गोरक्षणाचे महत्व सांगणारी 'वसुबारस'



दिपावलीतील पाहिला सण 'वसुबारस'. आश्विन कृष्ण द्वादशीस हा सण साजरा केला जातो. या दिवशी गोधनाची पूजा केली जाते. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूस उद्देशून हे व्रत केले जाते. अनेक जन्माच्या कामना पूर्ण व्हाव्यात याकरिता वासरासहित गायीची या दिवशी पूजा केली जाते. भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. धनाची निकड भागवण्यासाठी शेतकरी गोधन कसायाला विकू लागला आहे. सरकारने गाईंच्या सन्मानार्थ तिला राज्यमातेचा दर्जा तर दिला आहे; मात्र तिच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कोणतेही ठोस धोरण आखलेले नाही परिणामी राज्यात गाईंची संख्या प्रतिदिन घटतच आहे.

गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन वृत्तपत्रात वाचायला मिळतात. त्यामुळे राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही ? राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात येऊन आज १० वर्षांहून अधिक काळ लोटला; मात्र या कायद्यान्वये कोणाला शिक्षा झाल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असला तरी गोहत्या थांबलेल्या नाहीत. राज्यात अनेक ठिकाणी आजही प्रतिदिन गोवंश कापले जातात. बकरी ईदच्या निमित्ताने राज्यात हजारो गोवंशाची हत्या केली जाते. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय.

कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे म हत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे म हत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यात गोवंश हत्याबंदी विधयेक आणण्यात आले; मात्र आजमितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे.

तुळशी वृन्दावनाला प्रदक्षिणा घातल्यावर ज्याप्रमाणे शरिरात साकारात्मक ऊर्जा तयार होते त्याप्राणे गाईला प्रदक्षिणा घातल्या तरी आपल्या शरीरारात तेव्हढ्याच प्रमाणात सकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याचे युनिव्हर्सल स्कॅनर मापन यंत्राद्वारे करण्यात आलेल्या परीक्षणातून सिद्ध झाले आहे. ज्या भागात अधिक प्रमाणात गोहत्या होतात त्या भागात भूकंप होतात असे एका निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गाईला पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र जाणवते त्यामुळे चरताना आणि विश्रांती घेत असताना गाय नेहमी दक्षिणोत्तर असते. नवजात गोवंशाच्या आवाजाच्या ऐकण्यामुळे मानसिक आजारांमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचेही प्रयोगातुन सिद्ध झाले आहे. गाईच्या पाठीच्या कण्यातील सूर्यकेतु मज्जातंतू हानिकारक किरणोत्सर्गाला रोखून पर्यावरण स्वच्छ ठेवते. अशा कितीतरी प्रयोगांतून देशी गाईची उपयुक्तता सिद्ध झाली आहे.

वाढत्या गोहत्येमुळे आज देशी गाईंची संख्या कमालीची घसरली आहे. देशी गाईच्या अनेक प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. अधिक दुधाच्या हव्यासाने आज अनेक जण संकरित गाईचे पालन करत आहेत मात्र संकरित गाईच्या दुधात देशी गाईप्रमाणे कोणतीच उपयुक्त तत्वे नसतात. आजमितीला राज्यात असेही उद्योजकही आहेत ज्यांनी देशी गाईंचे महत्व ओळखून त्यांचे पालन करून गाईच्या दूध, शेण आणि गोमूत्र यांच्या विक्रीतून कोट्यवधींचा व्यवसाय उभा केला आहे. यातून इतरांनीही प्रेरणा घ्यायला हवी. राज्य सरकारने गोशाळांसाठी अनुदान देण्याची योजना तर आखली आहेत; मात्र त्याचा लाभ फारच कमी गोशाळांना मिळतो. परिणामी अनेक गोशाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या गोशाळा बंद पडल्या तर भविष्यात यांतील गोवंशाच्या चारा पाण्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. छत्रपतींच्या राज्यात गोमातांवर ओढवलेली ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. राष्ट्रीय स्तरावर गोवंश हत्याबंदी कायदा करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. गोमाता जसे हिंदूंचे श्रद्धास्थान आहे तशी ती सर्वांत उपयुक्त प्राणी असल्याचेही जागतिक स्तरावर सिद्ध झाले असताना गायीच्या रक्षणाचे कोणतेच प्रावधान केंद्र शासनाने आजतागायत केलेले नाही याउलट बीफ व्यवसायात अनेक नेतेमंडळींचे आर्थिक हितसंबंध आहेत. देशात अशीच गोहत्या होत राहिली तर उद्या नावालाही गोवंश शिल्लक राहणार नाही.

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## संपादकीय

### अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा



१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला गेला. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही.

अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

## वाचक पत्र

### फटाक्यांना फाटा देऊन प्रदूषण विरहित दिवाळी साजरी करणे गरजेचे...

दिपावली म्हणजे दिप आवली अर्थातच दिव्यांची ओळ किंवा दिव्यांची रांग अंधारावर प्रकाशाने मात करण्याचा दिवस हा सण संपूर्ण देशाच्या विविध भागात विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो दिवाळी हा सण म्हणजे एक औचित्य साधणारा सण आहे या सणाला मोठमोठ्या आवाजाचे महागडे, रोषणाई करणारे फटाके फोडले जातात त्यामुळे ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषण होते वारेमाप फटाके फोडल्यामुळे विविध महानगरांच्या हवेचा स्तर प्रचंड खालावते, फटांक्यांच्या कागदामुळे सफाई कामगारांचे मोठे हाल उडतात फक्त फटाके त्यांचे कागद, पुठ्ठे, कापड यांचा कचरा मोठ्या प्रमाणात जमा होतो त्यामूळे श्वासोच्छवास, डोळ्यांना नयेत म्हणून विविध संस्था, पर्यावरणवादी, मंडळे, शासन हे दर वर्षी आवाहन करतात मात्र त्याला हरताळ फासल्याचे दिसून येते सरकारच्या नियमांकडे कान्हाडोळा करुन अनेक व्यापारी काळाबाजाराने फटाके विक्री करतात यावर कोणाचाच अंकुश नाही त्यामुळे फटाके मोठ्या प्रमाणात वाजवले जात असल्याचे दिसून येते वाढदिवस, थर्टी फर्स्ट, राजकारण्यांच्या विजयी मिरवणुका साजऱ्या करतांना मोठ्या प्रमाणात मोठ्या आवाजाचे फटाके फोडून मोठा उन्माद दाखवतात हे थांबले पाहिजे सद्या ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषणचे प्रमाण वाढत असल्याने विविध आजारांनी जनतेला ग्रासल्याचे वास्तव आहे तरीपण अनेकजण फटाके फोडण्यात धन्यता मानतात त्यासाठी सरकारने अशा कार्यक्रमावेळी फटाके फोडण्यावर निर्बंध घालून कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे फटाके ऐवजी पर्यावरण समतोल राखण्याचे व सामाजिक स्वास्थ जपण्याचे कार्य करणे महत्वाचे ठरेल !



**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## गुन्हेगारांची धिंड काढून परिसरात कायद्याचा धाक

### गुन्हेगारांची धिंड - येरवडा पोलिसांचा कडक संदेश



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१६, येरवडा (पुणे) :** येरवडा पोलीस ठाणे हद्दीतील लक्ष्मी नगर परिसरात आर.के चौक या भागात येरवडा पोलीस ठाणे हद्दीतील लक्ष्मी नगर परिसरात ३ दिवसापूर्वी गाड्यांची तोडफोड करणाऱ्या टोळीविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर, इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये आलेल्या सातत्यपूर्ण बातम्यांनंतर अखेर पोलिसांनी मोठी कारवाई केली. या प्रकरणातील अटक आरोपी मुस्ताफा बशीर बेपारी, सैफ अली अझिमुद्दीन शेख आणि करण खंडेराव कुंभार यांना आज घटनास्थळी नेऊन चौकशी करण्यात आली. यावेळी पोलिसांनी आरोपींची धिंड काढून नागरिकांसमोर आणली. परिसरात नागरिकांनी या कारवाईचं स्वागत करत पोलिसांना दाद दिली. तोडफोडीच्या घटनेनंतर निर्माण झालेलं दहशतीचं वातावरण आता काहीसं ओसरलं आहे. पोलिसांनी घटनास्थळी तपास करत इतर पाहिजे आरोपींचा शोध सुरू ठेवला आहे. मीडियाच्या दाखल्यानंतर पोलिसांनी दाखवलेला हा ठोस आणि निर्भीड पवित्रा उल्लेखनीय ठरला असून येरवडा परिसरात कायद्याचा धाक पुन्हा निर्माण झाला आहे. नागरिकांनी अशा कारवाया सातत्याने होत राहाव्यात, तेव्हाच गुन्हेगारी आटोक्यात येईल अशी प्रतिक्रिया दिली आहे.

## पोंभुर्णा तालुक्यातील अर्थसाहाय्य निधी उपलब्ध करून द्यावा - अल्का आत्राम



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१६, पोंभुर्णा :** पोंभुर्णा तालुक्यातील मागील २ वर्षा पासून ज्या दारिद्र्य रेषेखालील महिला अगदी कमी वयात त्यांना पतीच्या निधनामुळे अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. तसेच अठराविश्र् दारिद्र्य कारण ही योजनाच दारिदय रेषेखालील लाभार्थी साठी आहे. त्यामुळे तालुक्यातील अर्थसाहाय्य निधी उपलब्ध नसल्यामुळे गरजू लाभार्थी मंजुरी आहे. रजिस्ट्रेशन झालं आहे, पण निधी अभावी राखडलेले आहे. तरी मंजूर केसेस ४० आहेत नवीन रजिस्ट्रेशन साठी ४० केसेस आहेत.

परंतु निधी नसल्याने लाभार्थी तहसील कार्यालयात चकरा मारतात कारण त्यांना वाटत मंजूर आहेत. पण पैसे का भेटत नाहीत. याची माहिती विधानसभेचे आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांना देण्यात आली त्यांनी जिल्हधिकारी यांचे संपर्क करून निधी उपलब्ध करून देण्यासाठी सांगितले. तसेच शासन स्तरावर सुद्धा तात्काळ बोलले.

अल्का आत्राम यांनी या संबंधने मा.आमदार महोदय यांना ही सर्व बाब लक्षात आणुन दिली. त्यामुळे त्यांनी तात्काळ सूचना करीत गरीब गरजू लाभार्थी यांना मदत करण्यासाठी सुधीर भाऊच्या माध्यमातून अल्का आत्राम सतत धडपड करत असतात आणि सतत पुढे असतात. त्यांनी यासाठी पुढाकार घेऊन पाठपुरावा सुरु केला आहे. तसेच आमदार मुनगंटीवार यांना लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी निवेदन दिले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# विसापुरात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा

### माजी जि.प.सदस्य रामभाऊ टोंगे यांच्या हस्ते शुभारंभ



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, (विसापूर) चंद्रपूर :** बल्लारपूर तालुक्यात विसापूर सर्वात मोठे गाव असून एकमेव पंचायत समिती गण आहे. येथील लोकसंख्या १६ हजारांवर असून वस्ती विभागात आरो, शुद्ध पाण्याची व्यवस्था नव्हती. ही गरज लक्षात घेऊन ग्रामपंचायत परिसरात आरो, शुद्ध पिण्याच्या पाण्याचे संयंत्र लावण्यात आले. यामुळे नागरिकांना नाममात्र दरात शुद्ध पिण्याचे पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. याचे लोकार्पण माजी जिल्हा परिषद सदस्य तथा विसापूरचे माजी सरपंच रामभाऊ टोंगे यांच्या हस्ते गुरुवार, दि.१६ आक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा कुळमेथे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष किशोर पंदीलवार, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत सदस्या रिना कांबळे, वैशाली पुणेकर, शशीकला जीवने, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे, लिपिक संतोष निपुंगे यांची उपस्थिती होती. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून नागरिकांना आरोच्या माध्यमातून शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी गाव पातळीवर ग्रामपंचायत नाममात्र शुल्क आकारणार असून वस्ती भागातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी सुलभ व मुबलक प्रमाणात मिळणार आहे. दरम्यान ग्रामपंचायत तर्फे रामभाऊ टोंगे यांचा शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संतोष निपुंगे यांनी केले. आभार ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे यांनी मानले. यावेळी गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती.

# आरोपींना अटक करा अन्यथा राज्यभर आंदोलन छेडणार - राज्य सरचिटणीस डॉ.आरोटे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष तथा दै. विदर्भ मतदारचे पत्रकार नयन मोंढे यांनी दैनिकात प्रसिध्द केलेल्या वृत्तावरुन त्यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ला करणार्यांवर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कारवाई होणेसाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबतीत निवेदन देण्यात आले. तसेच या हल्लूयाविरोधात गुन्हेगारांवर तत्काळ कारवाई करुन अटक करा अन्यथा राज्यभर आंदोलन छेडू असा इशारा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे यांनी दिला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष तथा दैनिक विदर्भ मतदार पत्रकार नवीन मोंढे यांनी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचशील नगरात बाल गुन्हेगारांचा धुमाकूळ ही बातमी छापल्यामुळे त्यांच्या घरावर वरली मटका चालक बाबू शेंडे याने रात्रीच्या सुमारास आधी घरामध्ये सुतळी बॉम्ब फेकला जे मारण्याचे धमकी देऊन अश्लील शिवीगाळ केली.

या घटनेची तक्रार नयन मोंढे पोलीस स्टेशनला देण्याकरीता गेले असता वरली मटका चालक बाबू शेंडे हा नयन मोंढे यांच्या घरावर त्याच्या ३ - ४ साथीदारांसह हातात पाईप घेऊन आला. घरातील महिलांना अशलील शिवीगाळ करण्यात आली. मटका चालक बाबू शेंडे या समाजकंटक गुंडावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने करण्यात आली. तसेच गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक करुन कारवाई करावी अन्यथा राज्यभर आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मिडीया प्र.अध्यक्ष सिध्दार्थ भोकरे, प्रदेश प्रसिध्द प्रमुख नवनाथ जाधव, संपर्क प्रमुख वैभव स्वामी, इले. मिडीया प्र.अध्यक्ष अतुल परदेशी, अमितकुमार खाडे, रुपेश पाडमुख, रमेश डोंगरे, संदिप भटेवरा, ॲड. रचना भालके आदींसह पत्रकार संघाचे राज्यभरातील पदाधिकारी यांनी दिला आहे.

# श्री.प्रेमनाथ गणू ठोंबरे यांना म्हसळा टाइम्सचा राज्यस्तरीय उद्योग भूषण पुरस्कार

### मी उद्योजक होणारच या संस्थेच्या मार्फत उद्योजक पुरस्कार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, मुंबई :** भोवडे गावचे सुपुत्र तसेच वन सोअर्स सर्व्हिस कंपनीचे मालक आणि कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज - महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री.प्रेमनाथ गणू ठोंबरे अतिशय खडतर जीवनप्रवासातुन नोकरी करत असतांना त्यांना ६० अधीक पुरस्कार मिळाले. तसेच सामाजिक संघटनांकडून १३ पुरस्कार मिळाले आहेत. उद्योग क्षेत्रातून ६ पुरस्कार मिळाले असून ११ ऑक्टोबर २०२५ रोजी म्हसळा टाइम्स राज्यस्तरीय उद्योग भूषण पुरस्कार आणि १४ ऑक्टोबर २०२५ रोजी मी उद्योजक होणारच या संस्थेमार्फत उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला. ठोंबरे यांनी अतिशय खडतर जीवनप्रवास करून त्यांचा नोकरीतील प्रवास मुंबईतील नामांकित कंपनी तसेच अमेरिकन कंपनीत अशी एकूण त्यांनी २२ वर्ष काम केले. सुरुवात रेकॉर्ड क्लार्क म्हणून केली आणि शेवट ग्रुप जनरल मॅनेजर म्हणून नोकरीला स्वल्पविराम दिला.

२०१० पासून वन सोअर्स सर्व्हिस कंपनीची सुरुवात करून आज मुंबईत यशस्वी उद्योजक म्हणून गेली १५ वर्ष काम करत आहेत. या कालावधीत अनेक शाळांना, सामाजिक संस्थाना तसेच अनेक आश्रम यांना मदत केली आणि करत आहेत. आज सामाजिक कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अशा या समाज सेवकाला त्यांच्या कार्याचा सलाम...

# फटाक्यांना लागली महागाईची आग...



### फटाके स्टॉल सजले; फॅन्सी प्रकारच्या दरात वाढ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** दिवाळीनिमित्त सर्वत्र आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण आहे. आनंद आणखीन द्विगुणित करण्यासाठी फटाक्यांची आतिषबाजी आणि रोषणाई करण्यासाठी शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुद्धा विविध ठिकाणी फटाके स्टॉल उभारण्यात आले आहेत. फटाक्यांमध्ये नाविन्यपूर्ण असे फॅन्सी आयटम्स विक्रीसाठी दाखल झाले आहेत. मात्र यंदाच्या दिवाळीतील फटाक्यांना देखील महागाईची आग लागली आहे.

फटाक्यांमध्ये दर तब्बल २० टक्क्यांनी वाढल्याने ग्राहक वाढत्या महागाईने वैतागले आहेत. दरम्यान दिपावलीचा सण अवघ्या दोन तीन दिवसांवर येऊन ठेपला आहे. या दिवाळीनिमित्त घरामध्ये गोडगोड फराळाचे पदार्थ बनवले जात आहे. कपड्यांची तसेच गृह सजावटीच्या वस्तूंची खरेदी केली जात आहे. अशातच रोषणाई करण्यासाठी दिव्यांच्या झगमगाट आणि आनंद साजरा करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजी आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध प्रकारच्या फटाके स्टॉलवर वाजणारे तसेच फॅन्सी फटाके विक्रीकरिता ठेवण्यात आले आहेत. या स्टॉलवर आबालवृद्ध ग्राहकांची गर्दी वाढत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

फटाक्यांच्या विविध फॅन्सी प्रकारात गतवर्षीपेक्षा यंदा थोडीशी वाढ झाली आहे. पर्यावरणपूरक असणारे बच्चे कंपनीसाठी खास आकर्षण लसूण, किटकॅट, बटरफ्लाय,पॉप -अप, त्याचप्रमाणे झाड, भूचक्र, शॉट्स, बंदूक असे नानाविविध प्रकारांवर आम्ही यावर्षी ग्राहकांसाठी डिस्काउंट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या सर्व फटाक्यांची किंमत सुमारे २०० रुपयांपासून ते हजार रुपयांपर्यंत आहे.

**- साई पाचपुते (धर्मानाथ फटाका स्टॉल, विक्रेते)**

दिवाळीचा सण आनंदात साजरा करण्यासाठी फटाक्यांची खरेदी वर्षांतून एकदा येणारा दिपावलीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी फटाक्यांची खरेदी केली जाते. जरी दर वाढले असले तरी थोड्याफार प्रमाणात फटाके खरेदी केले जातात आणि आनंद साजरा करतो.

**- सौरभ भालेराव (ओम थोपटे ग्राहक)**

# राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रवेशासाठी गर्दी; खा.सोनवणेंकडून कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा शब्द

### खा.बजरंग सोनवणेंवर विश्वास ठेवून झेडपी सदस्य ते सरपंचांनी केला प्रवेश



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, बीड :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने गुरुवार, दि.१६ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केज तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (सा.) येथे संपन्न झाली. यावेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी प्रवेशासाठी अक्षरश: रांग लागली होती. यावेळी आगामी निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभा राहून ताकद देऊ, असा विश्वास खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.

येडेश्वरी साखर कारखाना येथील बैठकीत बनसारोळा येथील माजी जि.प.सदस्य अशोक गायकवाड, माजी सरपंच युवराज काका काकडे, चिंचोलीमाळी येथील लहुजी वस्ताद सेवाभावी संस्था चे अध्यक्ष विठ्ठल झाडे, पिसेगाव येथील नवनाथ नेहरकर, आनेगावचे माजी सरपंच आप्पासाहेब हंडीबाग, एकनाथ हंडीबाग, विष्णू इंगळे, बिभीषण राऊत, विक्रम हंडीबाग, भैरवनाथ हंडीबाग, श्रीधर हंडीबाग, लक्ष्मण हंडीबाग, जिवराज हंडीबाग, नरसिंग हंडीबाग, नवनाथ हंडीबाग, अशोक हंडीबाग, नानासाहेब हंडीबाग, ज्ञानेश्वर खोडसे, दशरथ हंडीबाग, तुकाराम इंगळे, युसूफ वडगाव येथील युवा कार्यकर्ते विजय भूमकर, शिवानंद खरबड, शांतिलिंग खरबड तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला.

बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद चंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा मा.आ.संगिता ठोंबरे, मा.आ. पृथ्वीराज साठे, पं.स.केज माजी सभापती अशोक तात्या तारळकर, खरेदी विक्री संघ केजचे अध्यक्ष बालासाहेब दादा बोराडे, मा.जि.प.सदस्य युवराज गोरे, माजी अध्यक्ष विलास जोगदंड, पंचायत समिती केजचे माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, महिला तालुकाध्यक्ष तसलीम इनामदार, केज शहराध्यक्ष शब्दों खतीब माजी पं.स.सदस्य बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, प्रेमचंद कोकाटे, न.पं.केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, माजी नगरसेवक कपिल मस्के, शरीफ सय्यद, शितल लांडगे, विमल जोगदंड, व पंचक्रोशितील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# नमुंमपा अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त रू.३४,५०० सानुग्रह अनुदान जाहीर



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांचा दिवाळी सण आनंदात जावा यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षाकरिता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी यांना रू. ३४,५००/- तसेच करार / तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचारी यांना रू. २८,५००/- आणि आशा वर्कर यांना रु. १८,५००/- रक्कमेचे सानुग्रह अनुदान जाहीर केलेले आहे. यामध्ये महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांना रू. ३४,५००/- इतके सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे ठोक मानधनावर, किमान वेतनावरील तात्पुरत्या स्वरूपात करार पद्धतीवरील वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी - कर्मचारी, रोजंदारीवरील आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना रू. २८,५००/- इतकी सानुग्रह अनुदान रक्कम प्रदान केली जाणार आहे.

याशिवाय सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासनाने कंत्राटी तत्वावर नेमलेले व शासनाकडून मानधन प्राप्त होणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे रू. २८,५००/- इतके सानुग्रह अनुदान त्याचप्रमाणे आरोग्य विभागातील आशा वर्कर यांना रू. १८,५००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

यासोबतच यावर्षी आरोग्य विभागातील कोविड, नॉन कोविड अंतर्गत कार्यरत अधिकारी - कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील घड्याळी तासिका प्राथमिक व माध्यमिक शिक्षक कर्मचारी आणि अंशकालीन निदेशक (कला, क्रीडा व कार्यानुभव) यांनाही रू. १८,५००/- सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. अशाप्रकारे एकूण ४९६१ अधिकारी, कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्यास महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी मान्यता दिली आहे. या अनुषंगाने दिवाळी सणापूर्वीच ही रक्कम अधिकारी, कर्मचारी यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश सर्व विभागांना देण्यात आलेले असून त्यामुळे महापालिका अधिकारी, कर्मचारी यांची दिवाळी आनंदात जाणार आहे. दिवाळी सणाच्या अनुषंगाने महापालिका अधिकारी, कर्मचारी यांना मागील वर्षीपेक्षा रू.१५००/- इतक्या रक्कमेचे वाढीव सानुग्रह अनुदान वितरण करण्याच्या महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतलेल्या कर्मचारीहिताय निर्णयाचे महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाकडून स्वागत करण्यात आले आहे.

# बी.एस.ई.मार्फत श्री संत भगवान बाबा शासकीय आय.टी.आय. कॉलेज येथे कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : शिवाजी औंसेकर**

**दि.१५, पाटोदा (बीड) :** दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री संत भगवान बाबा शासकीय आय.टी.आय. कॉलेज पाटोदा येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच बॉम्बे स्टॉक (बी.एस.ई.) च्या माध्यमातून आय. टी.आय. च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. व यासोबत भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनचा कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य माननीय श्री विजय बेलेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच बी.एस.इ.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँक तसेच पोस्ट ऑफिस मध्ये असलेल्याविविध योजना,डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. एस.एस.जगताप, एस.एम वाकपांजर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले व प्रा.पी.ए.एस. शेख यांनी सूत्रसंचालन केले. तसेच या कार्यक्रमास प्रा.एम.व्ही पाळवदे, प्रा.कु.जे.एम.धुमाळ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चितलधाबा येथे ग्रामीण अभ्यास शिबिर समारोप समारंभ संपन्न



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१५, पोंभुर्णा :** एस.एन.डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई समाजकार्य विभागामार्फत ग्रामीण अभ्यास शिबिर समारोह समारंभ जि.प.उच्च प्राथमिक शाळा प्रांगण चिंतलधाबा येथे घेण्यात आले. समारोह कार्यक्रमात पंचभाई यांनी प्रस्तविक करताना आपल्या अनुभव संपन्न विचारांनी विद्यार्थ्यांना ग्रामीण समाज व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्था व विकास प्रक्रियेचे महत्त्व समजून घेण्यास मोठी मदत झाली. शिबिरा दरम्यान ग्रामपंचायत च्या वतीने सर्वेक्षण पी आर उपक्रम ग्रामसंवाद यासारख्या विविध शैक्षणिक उपक्रमासाठी दिलेले सहकार्य अतिशय मोलाचे ठरले आपले सहकार्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे आमच्या विद्यार्थ्यांचा अनुभव अधिक समृद्ध झाला आपल्या सक्रिय सहभागामुळे हे शिबिर केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक दृष्ट्या फलदाई ठरले आपल्या सहकार्यामुळे विद्यापीठ व गाव यांच्यातील संवाद अधिक मजबूत झाला आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा विद्यार्थ्याला लाभली मुख्य अतिथी म्हणून लाभलेले मा. डॉक्टर सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामीण जीवनाविषयी विध्यार्थीना योग्य मार्गदर्शन करून पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपस्थित मुख्य अतिथी म्हणून मा. आमदार डॉक्टर सुधीर मुनगंटीवार कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. राजेश इंगोले. अतिथी तहसीलदार सेलवटकर गटविकास अधिकारी नम्रता बांगर अलकाताई आत्राम प्रमुख उपस्थित सरपंच शुभांगी ताई कुतरमारे, उपसरपंच रोशन भाऊ ठेंगणे, ग्राम विकास अधिकारी आनंद कटकमवार सर्व सदस्य पोलीस पाटील शेडमाके सुमन आरके सर्व मॅडम विद्यार्थी व गावातील नागरिक उपस्थित होते.

